**फाईनल डिक्री अर्ज नं.७/२०१७ मधील निशाणी क्रमांक ३२ वरील आदेश**

(सीएनआर क्र.एमएचएएच०८००१२१२२०१७)

सदरचा अर्ज सामनेवालातर्फे सादर केलेली महत्वाची कागदपत्रे दाखल करणेकामी परवानगी मिळणेसाठी दिला आहे.

२. अर्जातील कथनानुसार सामनेवालाने अर्जात महत्वाचा पुरावा म्हणून वर्णनयादी निशाणी ३३ सोबत अपिल नं.८५/२०१६ मधील अपिल मेमो व रे. मु.नं.७७/१९९९ मधील निकालपत्राच्या साक्षांकीत प्रती सादर केल्या आहेत. सदरचे कागदपत्र आवश्यक व गरजेचे आहेत. त्यासाठी सादर केलेली कागदपत्रे दाखल करुन घेण्याची परवानगी मिळणे जरुरीचे आहेत. सबब, प्रस्तूतचा अर्ज दाखल केला आहे.

३. अर्जदारातर्फे आपले म्हणणे अर्जावरच दिले आहे. अर्जाचे अपिल चालू आहे. परंतु, त्यामध्ये कोणताही स्थगिती आदेश नाही. त्यामुळे सदरचा फायनल डिक्रीचा अर्ज पुढे चालविण्यात यावा. सबब, अर्ज रद्द करण्यात यावा.

४. दोन्ही बाजूंचे सुविद्य वकीलांचा युक्तिवाद ऐकला. कागदपत्रांचे अवलोकन केले.

५. प्रस्तूतच्या अर्जानुसार सामनेवालाने अपिल नं.८५/२०१६ मधील अपिल मेमो व रे.मु.नं.७७/१९९९ मधील निकालपत्राच्या साक्षांकीत प्रती सादर केल्या आहेत. सदरची कागदपत्रे दाखल करण्याची परवानगी सामनेवालाने मागितली आहे. अर्जदारातर्फे विरोध दर्शवितांना अपिल चालू आहे, परंतु त्यात कोणताही स्थगन आदेश नाही असे स्पष्ट केले आहे.

६. सामनेवालातर्फे सादर केलेली कागदपत्रे साक्षांकीत प्रती आहेत.

सदरहू कागदपत्रे पुराव्याचे कायद्यानुसार पुराव्यात वाचली जावू शकतात. अर्जदारातर्फे दर्शविलेला विरोध अर्जाच्या अनुषंगाने तथ्यहीन आहे. याकरीता सामनेवालाने सादर केलेली कागदपत्रे साक्षांकीत प्रती सार्वजनिक दस्त असल्या कारणाने त्या दाखल करुन घेऊन त्यास निशाणी देऊन पुराव्यात वाचणे न्यायोचित होणार आहे. त्याकरीता सदरचा अर्ज खर्चाशिवाय मंजूर करण्यात येत आहे. म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज (निशाणी क्रमांक ३२) खर्चाशिवाय मंजूर करण्यात येत आहे.

२. परिणामत: सामनेवालाने वर्णनयादी निशाणी ३३ नुसार सादर केलेली कागदपत्रे दिवाणी अपिल नं.८५/२०१६ मधील अपिल मेमो व रे.मु.नं.७७/१९९९ मधील निकालाच्या साक्षांकीत प्रती दाखल करुन घेऊन त्यास निशाणी देऊन पुराव्यात वाचण्याची परवानगी देण्यात येत आहे.

( एन. एल. येवलेकर )
दिनांक : १८/११/२०१९. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
संगमनेर